# वसई विरार शहर महानगरपालिका

## सेवानिवृत्त लेखाधिकारी / सहाय्यक लेखाधिकारी यांची करार पद्धतीने नियुक्ती करण्याबाबत.

महानगरपालिकेतील जमा व खर्चाचे बँक ताळमेळाचे प्रलंबित काम व याशिवाय राज्य शासनाकडील नियुक्त विविध संवर्गातील प्रतिनियुक्तीवरील अधिकारी कार्यरत आहेत. सदर अधिकारी यांचे विविध सेवा विषयक बाबींची पुर्तता वेळोवेळी करुन घेणे आवश्यक आंहे. उदा. अ) रजा व निवृत्ती वेतन अंशदान शासनाकडे जमा करणे. ब) सेवा पुस्तकातील नोंदीचे अद्यावतीकरण करणे. क) वेळोवेळी होणारी वेतन निश्चिती करणे इ. तसेच अन्य प्रलंबित आस्थापना विषयक कामे करण्याकरिता महाराष्ट्र वित्त व लेखा संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या लेखाधिकारी/ सहाय्यक लेखा अधिकारी यांची नियुक्ती करार पद्धतीने करण्याचे प्रस्तावित आहे. सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.संकीर्ण -२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.

सदर माहिती वसई विरार शहर महानगरपालिकेचे vvcmc.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुक व्यक्तींनी वेबसाईटवरील माहिती पाहून अर्ज करावेत. vvcmc.ac379@gmail.com या मेल आयडीवर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या सादर करावा.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
वसई विरार शहर महानगरपालिका

जावक क्र. व.वि.श.म./लेखा/ ८६ /2024-25

दिनांक २५ / ०८ /2024

# वसई विरार शहर महानगरपालिका

## सेवानिवृत्त लेखाधिकारी / सहाय्यक लेखाधिकारी यांची करार पद्धतीने नियुक्ती करण्याबाबत.

विभागाची आवश्यकता :

महानगरपालिकेतील जमा व खर्चाचे बँक ताळमेळाचे प्रलंबित काम करण्याकरिता महाराष्ट्र वित्त व लेखा संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या लेखाधिकारी/ सहाय्यक लेखा अधिकारी यांची खालील नमूद केलेल्या तक्त्यानुसार करार पद्धतीने नियुक्ती करण्याचे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १ | लेखा अधिकारी / सहाय्यक लेखाधिकारी | 2 | 1) विविध जमा व प्रदान व्यवहाराच्या नोंदीचा बँक खात्यासोबत ताळमेळ घेणे व अहवाल सादर करणे.<br>2) राज्य शासनाकडील प्रतिनियुक्तीवरील कार्यरत अधिकारी यांचे विविध संवा विषयक बाबींची वेळो वेळी पूर्तता करणे. उदा: अ) रजा व निवृत्ती वेतन अंशदान शासनाकडे जमा करणे. ब) सेवा पुस्तकातील नोंदीचे अद्यावतीकरण करणे. क) वेळोवेळी होणारी वेतन निश्चिती करणे इत्यादी तसेच अन्य प्रलंबित आस्थापना विषयक कामे करणे. |

**अटी व शर्ती -:**

1) सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.संकीर्ण-२७१५ / प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर , २०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.
2) लेखाधिकारी / सहाय्यक लेखाधिकारी पदासाठी राज्य शासनाच्या महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतून किमान ३ वर्षाचा अनुभव असलेला सेवानिवृत्त लेखाधिकारी / सहाय्यक लेखाधिकारी असावा.
3) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

4) उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

5) उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्हयात राहणारा असावा.

6) आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

7) उमेदवाराने त्यांचे अर्ज सदर पदाकरिता वेबसाइट वरील माहिती पाहून vvcmc.in या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत करावेत. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्र व्यवहारांची दखल घेण्यात येणार नाही.

8) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

9) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार वसई विरार शहर महानगरपालिकेचा राहील.

10) करार पद्धतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्याचा वसई विरार शहर महानगरपालिका येथे काम करावे लागेल.

11) इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.संकीर्ण-२७१५/ प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातून नमूद केल्याप्रमाणे राहतील.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
वसई विरार शहर महानगरपालिका